पणजी : सोमवार,
दि. १२ जानेवारी २०१५
गोवादूत

# ट्रेडीशनल तरुणाई...

## मोबाईलवर बोलणारा श्रीकृष्ण अन् वडापाव खाणारे मोगल...



महाविद्यालयीन दिवस म्हणजे असते मंतरलेले पर्व. याच काळात मिळते सृजनपंखांना बळ. असाच अनुभव घेतला दोडामार्ग कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी. विविध प्रकारची पारंपरिक वेशभूषा साकारून 'ट्रेडिशनल डे' साजरा करणारे विद्यार्थी. (छाया : संदीप देसाई)

■ संदीप देसाई,
दि. ११ दोडामार्ग

मोबाईलवर बोलणारा श्रीकृष्ण, वडापाव खाणारे खान, मावळ्यांना घेऊन चक्क बाजारपेठेतून फिरणारे शिवराय, तलवार व ढाल हातात घेत साऱ्यांसमोर धीटपणे उभी राहिलेली झाशीची राणी, तिरंगा हातात घेतलेली भारतमाता आणि सोबत सुभाषचंद्र बोस, मदर तेरेसा, सावित्रिबाई फुले या थोर मंडळींची साथ यामुळे दोडामार्ग महाविद्यालयाच्या युवाईने रविवारी साजरा केलेला ट्रेडीशनल डे शहरवासीयांसाठी लक्षवेधी; तर महाविद्यालयीन तरुणाईसाठी यादगार ठरला.

पंचायत समितीचे सभापती महेश गवस यांच्या उपस्थितीत या जल्लोषाचा समारोप झाला. यावेळी त्यांनी 'ट्रेडीशनल डे'च्या माध्यमातून महाविद्यालयीन तरुणाईने आपली संस्कृती जोपासल्याबद्दल आणि देशहितासाठी आपले जीवन अर्पण केलेल्या महामानवांची आठवण करून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील युवाईने आज मोठ्या जल्लोषी वातावरणात 'ट्रेडीशनल डे' साजरा केला. कॉलेजमधील अवघी तरुणाई विविधांगी पेहराव व वेशभूषा धारण करून या 'ट्रेडीशनल'च्या धुमम ध्ये सहभागी झाली होती. महाविद्यालय ते दोडामार्ग शहर बाजारपेठ अशी भव्य शोभायात्रा काढून युवाईने जल्लोष साजरा केला. या शोभायात्रेचा शुभारंभ दोडामार्गचे सरपंच संतोष नानचे यांचे हस्ते झाला. त्यानंतर महाविद्यालय ते दोडामार्ग शहर बाजारपेठेत रॅली काढून पंचायत समितीजवळ सभापती महेश गवस यांच्या उपस्थितीत या 'ट्रेडीशनल डे'चा जल्लोषाचा समारोप झाला. महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रज्ञाकुमार गाथाडे, खडपकर, जाधव, मोरे, बर्वे, दरेकर, ढेपे, नाईक आदींनी मुलांना प्रोत्साहन दिले.







